शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व त्यांच्याशी संलग्नित रुग्णालयातील सहयोगी प्राध्यापक संवर्गाचा विषयनिहाय आकृतीबंध..
**सहयोगी प्राध्यापक, उर:शल्यचिकित्साशास्त्र**

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**
शासन निर्णय क्र. File No. MEDD-१२/२१/२०२५-MMD(Vais-२)/९८२६०९
९ वा मजला, नवीन गो.ते.रु.इमारत, गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.
दिनांक:- १७ फेब्रुवारी, २०२५

**वाचा :-** १) वै.शि.व औ.द्र.वि., शा.नि. क्र.पदआ-२०१०/प्र.क्र.२५२/१०/वैसेवा-२, दि.२७.१०.२०१०
२) वै.शि.व औ.द्र.वि., शा.नि. क्र. पदआ-२०२२/प्र.क्र.२७/१०/वैसेवा-२, दि.२५.०८.२०२३
३) वै.शि.व औ.द्र.वि., शा.नि. क्र MEDD-१७०७/८/२०२४-MMD(Vais-१/८१५८६७ दि.१४.१०.२०२४

**शासन निर्णय** :-

संदर्भाधिन शासन निर्णय क्र. १ अन्वये वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या आस्थापनेवरील तसेच त्यांचया अखत्यारीतील शासकीय वैद्यकीय, दंत महाविद्यालये व त्यांच्याशी संलग्नित रुग्णालये, आरोग्य केंद्रे, परिचर्या शिक्षण संस्था, मुंबई या संस्थांमधील वर्ग-१ ते वर्ग-४ च्या शैक्षणिक व अशैक्षणिक पदांचा आढावा घेवून सहयोगी प्राध्यापक या संवर्गाच्या आकृतीबंधास मान्यता देण्यात आलेली आहे. तद्नंतर झालेल्या नविन पदनिर्मितीमुळे व शासन निर्णय दि.२४.०४.२०२४ अन्वये स्थानांतरीत/ रुपांतरीत केलेल्या पदांमुळे शासन निर्णय दि.२५.०८.२०२३ अन्वये सहयोगी प्राध्यापक, उर:शल्यचिकित्साशास्त्र संवर्गाचा एकूण ०८ पदांचा संस्थानिहाय आकृतीबंध निश्चित करण्यात आलेला आहे.

२. आता, दि.१४.१०.२०२४ अन्वये अतिविशेषोपचार रुग्णालय, यवतमाळ, लातूर व अकोला येथे नव्याने पद निर्माण करण्यात आल्याने सहयोगी प्राध्यापक, उर:शल्यचिकित्साशास्त्र या विषयात प्रत्येकी ०१ प्रमाणे एकूण ०३ पदाची वाढ झाली आहे. त्यामुळे शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, दि.२४.०१.२०२३ अन्वये मंजूर केलेला आकृतीबंध व तदनंतर नव्याने निर्माण केलेली पदे विचारात घेऊन सहयोगी प्राध्यापक, सुघटनशल्यचिकित्साशास्त्र संवर्गाचा संस्थानिहाय आकृतीबंध पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | मंजूर पदसंख्या |
|---|---|---|
| १ | ग्रँन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी.समुह रुग्णालय, मुंबई | २ |
| २ | बै.जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ससुन सर्वोपचार रुग्णालय, पुणे | १ |
| ३ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय/ ट्रामा केअर सेंटर, नागपूर | २ |
| ४ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद | १ |
| ५ | छत्रपती प्रमिला राजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर | २ |
| ६ | श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, यवतमाळ | १ |

| | | |
|---|---|---|
| ७ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, अकोला | १ |
| ८ | श्री.विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, लातूर | १ |
| | एकूण | ११ |

सहयोगी प्राध्यापक, उर:शल्यचिकित्साशास्त्र या विषयातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयनिहाय हा आकृतीबंध अंतिम आहे. त्यामुळे कोणत्याही अध्यापकाच्या वैयक्तिक हिताकरीता यापुढे एका विषयातील पद दुस-या विषयात रुपांतरीत करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केल्यास तो मान्य केला जाणार नाही.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सु.द.धोंडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
२) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
३) सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये. (संचालक, वै.शि. व सं. मुंबई यांचेमार्फत)
४) निवड नस्ती (वैसेवा-२).